# मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी

# ( रजा प्रवास सवलत )

# विनियम, १९९२

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ -** (१) या विनियमांना "मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (रजा प्रवास सवलत) विनियम, १९९२" असे म्हणावे.

(२) ते, शासकीय राजपत्रात शासनाची मान्यता प्रकाशित झाल्याच्या दिनांकास अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

**२.** व्याख्या - या विनियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(१) 'मंडळ, अध्यक्ष, उपाध्यक्ष व एखादा विभागप्रमुख' यांचा अर्थ 'मुख्य बंदरे विश्वस्त मंडळ अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३८)' यात अनुक्रमे नेमून दिलेल्याप्रमाणेच असेल.

(२) 'लेखाधिकारी' याचा अर्थ, मंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, आणि या विनियमांअन्वये कर्मचा-यांच्या दाव्यांचे विनियमन करण्याकरिता नियुक्त केलेल्या वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी पदनिर्देशित केलेला /केलेले मंडळाच्या लेखा विभागातील कोणताही अन्य अधिकारी (अनेक अधिकारी), असा आहे.

(३) 'सवलत' याचा अर्थ, या विनियमांअन्वये अनुज्ञेय असलेली 'रजा प्रवास सवलत', असा आहे.

(४) 'कर्मचारी' याचा अर्थ, मंडाळाचा कोणताही कर्मचारी, असा आहे.

(५) ‘भारतातील एखादे ठिकाण’ यात, भारताच्या राज्यक्षेत्रातील कोणतेही ठिकाण - मग ते मुख्य भूमीवर असो वा समुद्रपार असो -त्याचा समावेश असेल.

(६) ‘अगदी जवळचा थेट मार्ग’ याचा अर्थ, पुरवणी नियम 30 मध्ये दिलेल्याप्रमाणे व त्या अन्वये वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशामध्ये दिलेल्याप्रमाणे समान अर्थ असेल.

(७) "दोन वित्तीय वर्षांच्या एका कालावधीतून एकदा" या शब्द प्रयोगाचा अर्थ, **१९७५–७६** या वित्तीय वर्षापासून प्रारंभ होणा-या दोन वित्तीय वर्षांच्या प्रत्येक गटातून एकदा, असा आहे.

(८) "चार वित्तीय वर्षांच्या एका कालावधीतून एकदा" या शब्द प्रयोगाचा अर्थ, **१९७५–७६** या वित्तीय वर्षापासून प्रारंभ होणा-या चार वित्तीय वर्षांच्या प्रत्येक गटातून एकदा, असा आहे.

३. (१) या विनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, मंडळाच्या पुढील कर्मचा-यांना सवलत अनुज्ञेय असेल -

(अ) ‘ब’ वर्ग किनारा कामगार; आणि

(ब) कंत्राटी कर्मचारी,

जर कंत्राटाचा कालावधी हा एक वर्षापेक्षा अधिक असेल, तर एक वर्ष अखंडित सेवा पूर्ण झाल्यावर कंत्राटी पद्धतीने नेमलेला प्रत्येक कर्मचारी सवलतीसाठी पात्र असेल. जेव्हा प्रारंभिक कंत्राट एका वर्षासाठी असेल परंतु नंतर त्यात वाढ करण्यात आली असेल तेव्हा, या प्रयोजनासाठी कंत्राटाचा एकूण कालावधी विचारात घेतला जाईल.

कंत्राटी कर्मचा-यांना पुढील शर्तींच्या अधीन राहून सवलत देण्यात येईल:-

(एक) अशा कर्मचा-यांच्या बाबतीत, दोन वर्षांचे लागोपाठचे गट किंवा चार वर्षांचे लागोपाठचे गट यांची गणना त्यांनी मंडळात पद धारण करण्याच्या प्रत्यक्ष दिनांकापासून करण्यात येईल.

(दोन) संबंधित कर्मचारी स्वत:साठी सवलतीचा फायदा घेईल त्यावेळी, तो मंडळातील एखाद्या पदावर रूजू होण्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या किंवा प्रकरणपरत्वे चार वर्षांच्या एका कालावधीकरिता मंडळाच्या सेवेत असण्याची शक्यता आहे असे समुचित प्रशासकीय प्राधिका-याकडून प्रमाणित केले जाईल. प्रकरणपरत्वे नंतरच्या दोन वर्षांच्या किंवा चार वर्षांच्या कालावधीतील सवलतीची अनुज्ञेयता ही सुध्दा याच शर्तींच्या अधीन असेल.

(क) पुनर्नियुक्त केलेले सेवानिवृत्त कर्मचारी - वरील विनियम (ब) मध्ये घालून दिलेल्या शर्तींच्या अधीन राहून, ज्यांना पुनर्नियुक्त केले आहे असे सेवानिवृत्त कर्मचारी एक वर्षाची अखंडित सेवा पूर्ण झाल्यावर

या सवलतीसाठी पात्र आहेत. परंतु सेवानिवृत्तीनंतर लगेचच पुनर्नियुक्ती झाली असेल त्याबबत पुनर्नियुक्त सेवेचा कालावधी हा, सवलतीच्या प्रयोजनाकरिता पूर्वीच्या सेवेपासून अखंडित असल्याचे मानण्यात येईल आणि पुनर्नियुक्त कालावधी करिता सवलत मान्य करण्यात येईल. (परंतु कर्मचारी सेवानिवृत्त झाला नसल्याप्रमाणे त्यास ही सवलत अनुज्ञेय असणे सुरुच राहील)

(ड) एखादे राज्य शासन/केंद्र सरकार/स्वायत्त मंडळे/सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांच्या सेवेत असलेल्या आणि मुंबई बंदर विश्वस्तमंडळात प्रतिनियुक्तीवर असलेल्या व्यक्ती.

(२) पुढील कर्मचा-यांना ही सवलत अनुज्ञेय असणार नाही:-

(अ) जे त्यांच्या नियामक सेवेच्या अटी व शर्तींनुसार मोफत पासेस आणि/किंवा विशेष सवलत तिकीटांसाठी पात्र आहेत असे रेल्वे विभागाचे आणि यंत्र अभियांत्रिकी विभागाचे इंजिन व मालडब्बा आस्थापनेचे कर्मचारी;

(ब) पूर्वी अनुज्ञेय असलेल्या मोफत पासेस आणि/किंवा विशेष सवलत तिकीटांऐवजी एखाद्या मासिक विशेष प्रवास भत्ता घेणारे रेल्वे विभागाचे आणि स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या रेल्वे अभियांत्रिकी कक्षाचे कर्मचारी;

(क) मंडळाचे पूर्णवेळ कर्मचारी नसलेल्या व्यक्ती; किंवा

(ड) आकास्मिक खर्चातून वेतनाचे प्रदान केले जाणा-या व्यक्ती.

(३) एखाद्या कर्मचा-याने किंवा प्रकरणपरत्वे त्याच्या कुटुंबाने केलेल्या प्रवासाच्या दिनांकास अखंडित सेवेचे एक वर्ष पूर्ण केलेले नाही अशा कर्मचा-यास ही सवलत अनुज्ञेय असणार नाही. सवलतीच्या अनुज्ञेयतेसाठी प्रवास करण्याच्या दिनांकास एक वर्षाच्या अखंडित सेवेबाबतची शर्त ही, स्थायी कर्मचारी आणि परिवाक्षाधीन कर्मचारी तसेच अस्थायी व स्थानापन्न कर्मचा-यांनाही समानतेने लागू आहे.

**टीप**:

(अ) मंडळाच्या निलंबित कर्मचा-यास, निलंबन कालावधीत नैमित्तिक रजेसह कोणतीही रजा मिळू शकत नसल्याने त्याला रजा प्रवास सवलतीचा फायदा देखील मिळू शकणार नाही.

(ब) पोर्ट ट्रस्ट मंडळात प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिका-यांना रजा प्रवास सवलत -

पोर्ट ट्रस्ट मंडळात प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिका-यांना प्रवास सवलत आपोआप अनुज्ञेय होईल; या बाबतीत विवक्षित मंजूरी घेणे आवश्यक असेल.

(क) केंद्रीय नागरी सेवा रजा प्रवास सवलत नियमांमध्ये करण्यात आलेले कोणतेही बदल हे, मंडळाच्या मान्यतेने पोर्ट ट्रस्टच्या कर्मचा-यांना त्याच दिनांकापासून योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

(४) हक्काची वारंवारता - (१) कर्मचा-यास दोन वित्तीय वर्षांच्या एका कालावधीत एकदा त्याच्या स्वग्रामी प्रवास करण्याकरिता आणि चार वित्तीय वर्षांच्या एका कालावधीत एकदा भारतातील कोणत्याही ठिकाणी प्रवास करण्याकरिता ही सवलत अनुज्ञेय असेल.

(२) एखाद्या कर्मचा-याचे कुटुंब त्याच्या कामाच्या ठिकाणापासून अन्य दूरच्या ठिकाणी वास्तव्यास असेल अशा कर्मचा-यास त्याच्या कुटुंबासाठी व त्याच बरोबर स्वत:साठी दोन वित्तीय वर्षाच्या एका गटात एकादा सवलतीचा फायदा घेण्याऐवजी अशा गटातील प्रत्येक वर्षात एकदा केवळ त्याच्या स्वत:साठी स्वग्रामी जाण्याकरिता सवलत घेता येईल.

**स्पष्टीकरण:**

‘दोन वित्तीय वर्षांच्या एका कालावधीत एकदा’ या संज्ञेचा अर्थ , ‘**१९७५–७६** या वित्तीय वर्षापासून प्रारंभ होणा-या दोन वित्तीय वर्षांच्या प्रत्येक गटात एकदा’ असा आहे.

‘चार वित्तीय वर्षांच्या एका कालावधीत एकदा’ या संज्ञेचा अर्थ, ‘**१९७५–७६** या वित्तीय वर्षापासून प्रारंभ होणा-या चार वित्तीय वर्षांच्या प्रत्येक गटात एकदा’ असा आहे.

(३) जे कर्मचारी आणि त्यांची कुटुंबे दोन वर्षांच्या एका गटात किंवा प्रकरणपरत्वे चार वर्षांच्या एका गटात त्यांच्या स्वत:करिता सवलतीचा फायदा घेण्यास असमर्थ ठरतील त्यांना, दोन वर्षांच्या पुढील गटातील पहिले वर्ष संपण्यापूर्वी किंवा प्रकरणपरत्वे चार वर्षांच्या पुढील गटातील पहिले वर्ष संपण्यापूर्वी ही सवलत घेण्याची परवानगी देण्यात यावी.

(४) परतीच्या प्रवासाच्या प्रसंगी लागोपाठचे वित्तीय वर्ष समाप्त झाल्यास, ज्या वित्तीय वर्षात बाहेर जाण्याच्या प्रवासास सुरुवात झाली होती त्या वर्षापासून सवलतची गणना करण्यात येईल.

५. हक्क - (१) सर्व कर्मचा-यांना दोन वर्षांच्या एका गटात एकदा 'स्वग्रामी' जाण्यासाठी आणि चार वर्षांच्या एका गटात एकदा भारतातील कोणत्याही ठिकाणी जाण्यासाठी ही सवलत घेण्याचा हक्क असेल.

(२) मंडळ संपूर्ण प्रत्यक्षतील प्रवास भाडे देईल, कर्मचा-याच्या निम्न अथवा उच्च श्रेणीतील प्रवासावर कोणताही आक्षेप असणार नाही. परंतु, सवलतीबाबतची मंडळाची जबाबदारी ही, हक्कदार असलेल्या वर्गाच्या किंवा प्रत्यक्षात लाभ घेतलेल्या निम्न वर्गाच्या सोयी सुविधांचे प्रवास भाडे देण्यापुरतीच मर्यादित असेल.

(३) जो कर्मचारी त्याच्या 'स्वग्राम' प्रवास सवलतीसाठी हक्कदार आहे तो चार वर्षाच्या एका गटात एकदा भारतातील कोणत्याही ठिकाणी प्रवास करण्याच्या सवलतीसाठी सुध्दा हक्कदार असेल, तथापि, जर त्याने चार वर्षांच्या एका गटात एकदा भारतातील कोणत्याही ठिकाणी प्रवास करण्याच्या सवलतीचा वापर केला असेल तर, ती सवलत 'स्वग्रामी' भेट देण्याच्या सवलती ऐवजी असेल व त्याप्रमाणे समायोजित केली जाईल आणि यामध्ये विनियम ४ च्या उपविनियम (३) अन्वये पुढे नेता येईल, जर कोणतीही असेल, ती सवलत जिचा तो कर्मचारी भारतातील ठिकाणचा प्रवास करण्याच्या वेळी घेण्यास हक्कदार आहे अशा सवलतीचा समावेश असेल. या शिवाय जर असा कर्मचारी त्या वर्षाची 'स्वग्रामी' जाण्याची सवलत पुढे नेण्याकरिता हक्कदार असेल तरच केवळ तो पुढील चार

वर्षाच्या नंतरच्या गटातील पहिल्या वर्षात सवलत पुढे नेण्याकरिता हक्कदार असेल.

(४) प्रत्येक प्रकरणात, प्रवास हा ‘स्वग्रामास जाणे व परत येणे’ असा असेल आणि जाण्याच्या व परतीच्या अशा दोन्ही प्रवासांकरीता सवलतीची मागणी करता येईल. ‘स्वग्रामास जाण्याच्या’ प्रवासाची सुरुवात ही एकतर कर्मचा-याच्या स्वत:च्या बाबतीत किंवा त्याच्या कुटुंबाच्या बाबतीत मुंबई पासून किंवा मुंबई येथूनच करणे गरजेचे असणार नाही. परंतु अनुज्ञेय सहाय्य हे प्रत्यक्षात प्रवास केलेल्या अंतरासाठी अनुज्ञेय असलेल्या रकमेइतके व मुंबई आणि कर्मचा-याचे ‘स्वग्राम’ या दरम्यान होणा-या प्रवासाकरिता जे अनुज्ञेय झाले असते त्या मर्यादेपर्यंतच अनुज्ञेय असेल.

६. कुटुंबाची व्याख्या:

(अ) ‘कुटुंब’ याचा अर्थ, बदली झाल्यानंतर दिल्या जाणा-या प्रवास भत्त्याच्या प्रयोजनासाठी डाक व तार विभागाने संकलित केलेल्या मूळ नियमांत व पुरवणी नियमांत वेळोवेळी केलेल्या सुधारणेप्रमाणे, पुरवणी नियम २(८) मध्ये ज्या रीतीने अर्थ लावण्यात आला आहे त्याप्रमाणे असेल. जेथे पती व पत्नी दोघेही कर्मचारी असतील त्याबबतीत, पतीला किंवा पत्नीला अनुज्ञेय असलेल्या प्रमाणात सवलत अनुज्ञेय असेल, व दोघांनाही सवलत अनुज्ञेय नसेल.

(ब) कर्मचारी व कुटुंब हे स्वतंत्र घटक असणे -

कर्मचा-याच्या कुटुंबांतील सदस्यांनी मंडळाच्या कर्मचा-यासोबत प्रवास करणे गरजेचे नाही किंवा मंडळाच्या कर्मचा-याने त्या वर्षात प्रवास केला असेल त्याच

वित्तीय वर्षात कुटुंबाच्या सदस्यांनी प्रवास करणे आवश्यक असणार नाही. मंडळाच्या कर्मचा-याने सवलतीचा लाभ घेतलेला असो किंवा नसो, कुटुंबातील सदस्यांना स्वतंत्रपणे सवलत मिळेल. कुटुंबातील सदस्यांना एकत्रितपणे किंवा वेगवेगळ्या गटात स्वतंत्रपणे, त्यांना सोयीस्कर वाटेल त्याप्रमाणे प्रवास करता येईल. जेव्हा ते वेगवेगळ्या गटात वेगवेगळ्या वेळी प्रवास करतील तेव्हा, खर्चाची प्रतिपूर्ती ही त्या त्या प्रत्येक गटानुसार मान्य केली जाईल, परंतु, पहिला गट ज्या चालू असलेल्या गट वर्षाच्या कालावधी दरम्यान प्रवास करेल त्याच दरम्यान हा प्रवास केला गेला पाहिजे. प्रत्येक गटाचा परतीचा प्रवास हा त्या गटाने बाहेर जाण्याच्या प्रवासास प्रारंभ केला असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत पूर्ण केलाच पाहिजे. ही शर्त विशेष प्रकरणांमध्ये विभागप्रमुखांकडून, आणि विभागप्रमुखांच्या बाबतीत उपाध्यक्ष किंवा अध्यक्षांकडून शिथिल केली जाईल.

(क) मंडळाचे कर्मचारी आणि /किंवा सदस्य /(अनेक सदस्य) एकाच गट वर्षात स्वग्राम किंवा भारतातील कोणत्याही ठिकाणास भेट देऊ शकतील.त्याच गट वर्षात कुटुबांतील काही सदस्य ‘स्वग्रामी’ भेट देण्यासाठी, तर इतर सदस्य भारतातील कोणत्याही ठिकाणास भेट देण्यासाठी सवलतीचा लाभ घेऊ शकतील.

(ड) मंडळाचे कर्मचारी आणि/किंवा कुटुंबाचा सदस्य /(अनेक सदस्य )एकाच किंवा वेगवेगळ्या ठिकाणांना भेट देऊ शकतील. भारतातील कोणत्याही ठिकाणास भेट देण्यासाठीच्या सवलतीचा लाभ घेतेवेळी, मंडळाचा कर्मचारी आणि/किंवा त्याच्या कुटुंबाचा सदस्य /(अनेक सदस्य) एकाच किंवा त्यांच्या पसंतीच्या वेगवेगळ्या ठिकाणांना भेट देऊ शकतील.

(इ) एक मार्गी प्रवासकरिता सवलत:

स्वतंत्रपणे जाण्याच्या आणि परतीच्या प्रवासाच्या वेळेस असलेल्या वास्तविक परिस्थितीच्या आधारे मंडळाच्या कर्मचा-यांच्या कुटुंबातील सदस्यांना सवलत अनुज्ञेय असेल.

**<u>स्पष्टीकरण:</u>**

(क) फक्त बहिर्गामी प्रवासाच्या संबंधातील प्रतिपूर्तीस खालील व्यक्ती हक्कदार असतील:-

(एक) स्वग्रामी गेल्यानंतर अवलंबित मुलगा/मुलगी यास नोकरी मिळाल्यास किंवा तो/ती विवाहबध्द झाल्यास किंवा शिक्षण सुरु ठेवण्याकरिता तेथेच थांबल्यास;

(दोन) स्वग्रामापर्यंत प्रवास करणा-या कुटुंबाचा स्वग्रामाहून परतीचा प्रवास पूर्ण करण्याचा उद्देश नसल्यास; परंतु मंडळाच्या कर्मचा-याने, एखाद्या नंतरच्या तारखेस कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या परतीच्या प्रवासाच्या संबंधातील सवलत लेखी स्वरुपात सोडून देली असेल.

(ख) फक्त परतीच्या प्रवासाच्या संबंधातील प्रतिपूर्तीस पुढील व्यक्ती हक्कदार असतील :-

(एक) स्वग्रामाहून मुख्यालयाच्या ठिकाणी येणारे नवविवाहित पती/पत्नी किंवा दीर्घ काळापासून स्वग्रामी वास्तव्यास असणारे आणि स्वग्रामी

जाण्याच्या प्रवासाच्या संबंधात रजा प्रवास सवलतीचा लाभ न घेतलेले पती/पत्नी;

(दोन) स्वग्रामी शिक्षण सुरु असणारा/असणारी किंवा तेथे आजी-आजोबांसह राहणारा/राहणारी किंवा एकट्याने किंवा पालकांसह स्वग्रामाहून परत येणारा/येणारी अवलंबित मुलगा/मुलगी;

(तीन) पूर्वी ३ वर्षांपेक्षा कमी वय असलेले परंतु परतीच्या प्रवासाच्या वेळी वयाची तीन वर्षे पूर्ण केलेले एखादे मूल;

(चार) स्वग्रामी राहत असताना मंडळाच्या कर्मचा-याने वैधरीत्या दत्तक घेतलेले एखादे मूल.

**टीप:**

जर एखादे मूल जातानाच्या प्रवासाच्या वेळी १२ वर्षांपेक्षा कमी वयाचे होते परंतु परतीच्या प्रवासाच्या वेळी त्याने वयाची १२ वर्षे पूर्ण केली असतील तर ते जातानाच्या प्रवासाच्या अर्धे प्रवासभाडयास व परतीच्या प्रवासाच्या पूर्ण प्रवासभाडयास हक्कदार असेल.

(फ) जेव्हा मंडळाच्या कर्मचा-याच्या पती/पत्नीची जेथे रजा प्रवास सवलत सुविधा उपलब्ध आहे अशा मंडळा व्यतिरिक्त इतर कार्यालयात नियुक्ती झालेली असेल तेव्हा,

मंडळाच्या कर्मचा-याने रजा प्रवास सवलतीची मागणी करण्याच्या वेळी खालीलप्रमाणे एक प्रमाणपत्र सादर करावे:

"प्रमाणित करण्यात येते की माझी /माझे पत्नी/पती हिच्या/यांच्या साठी मी रजा प्रवास सवलतीची मागणी केलेली असून ती/ते (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/महामंडळ/ स्वायत्त संस्था इत्यादी चे नाव) येथे नोकरीस असून त्यांच्याकडून रजा प्रवास सवलत देण्यात येते. परंतु तिने/त्यांनी तिच्या/त्यांच्या नियोक्त्यांकडे रजा प्रवास सवलतीच्या सुविधेची मागणी केलेली नाही आणि ती/ते भविष्यात अशी मागणी करणार नाही."

(ग) वरील (फ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पती/पत्नी अशाप्रकारे नोकरीस नसल्यास:

त्या बाबतीत मंडळाच्या कर्मचा-याने खालीलप्रमाणे एक प्रमाणपत्र द्यावे:

"प्रमाणित करण्यात येते की, माझी/माझे पत्नी/पती हिच्या/यांच्या साठी मी रजा प्रवास सवलतीची मागणी केलेली असून ती/ते केंद्र सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून पूर्णत: किंवा अंशत: अर्थ सहाय्य केल्या जाणा-या व ज्यांच्याकडून आपल्या कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबियांना रजा प्रवास सवलतीची सुविधा दिली जाते अशा कोणत्याही सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/महामंडळ/स्वायत्त संस्था इत्यादी मध्ये नोकरीस नाही. "

(ह) पती व पत्नी दोघेही मंडळाचे कर्मचारी असल्यास:

जे दोघेही पती व पत्नी मंडळाचे कर्मचारी असतील अशा प्रकरणात, इतर मंडळाच्या कर्मचा-याच्या एखाद्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे पतीस किंवा पत्नीस प्रवास सवलतीचा लाभ मिळू शकेल. जेव्हा पती किंवा पत्नी हे मंडळाचा कर्मचारी असलेल्या आपल्या जोडीदारासह राहत असतील

तेव्हाच केवळ ही शर्त लागू असेल. जर कोणत्याही कारणासत्व ते वेगळे राहत असतील तर, ते दोन वेगवेगळे कर्मचारी असल्याप्रमाणे त्याच्या किंवा तिच्या स्वत:च्या हक्कानुसार स्वतंत्रपणे सवलतीची मागणी करु शकतील.

(आय)कुटुंबाकरिता वेगळी मागणी करता येईल:

जेव्हा मंडळाचा कर्मचारी आणि त्याचे कुटुंबिय हे, वेगवेगळे प्रवास करतील तेव्हा, त्याने सादर केलेल्या वेगळ्या मागणीवर कोणताही आक्षेप असणार नाही.

(ज) स्वग्रामा व्यतिरिक्त इतर ठिकाणी शिक्षण घेत असणा-या मुलांबाबत:

मंडळाच्या कर्मचा-यावर पूर्णत: अवलंबून असलेली परंतु शिक्षण घेण्यासाठी त्याच्यापासून दूर वसतिगृहांत राहत असलेली मुले कर्मचा-याच्या कुटुंबाचे सदस्य म्हणून स्वग्राम व भारतातील कोणतेही ठिकाणी या दोन्ही साठी रजा प्रवास सवलतीचा लाभ घेऊ शकतात. त्यांचा बाबतीत, सवलतीची मागणी ही, शिक्षणाच्या ठिकाणापासून स्वग्राम/भारतातील कोणतेही ठिकाण येथपर्यंत आणि परत शिक्षणाच्या ठिकाणापर्यंत किंवा मंडळाच्या कर्मचा-याच्या मुख्यालयापासून स्वग्राम/भारतातील कोणतेही ठिकाण येथपर्यंत आणि परत, या करिता अनुज्ञेय असणा-या रकमेपैकी जी रक्कम कमी असेल त्या रकमेपर्यंत मर्यादित असेल.

(के) मंडळाच्या अविवाहित कर्मचा-यांना स्वग्रामी जाण्याकरिता रजा प्रवास सवलत दरवर्षी अनुज्ञेय असेल.

मंडळाच्या ज्या अविवाहित कर्मचा-यांवर पूर्णत: अवलंबून असलेले आई-वडील, बहिणी आणि अज्ञान भाऊ त्यांच्या स्वग्रामी राहत असतील त्यांना सुध्दा दरवर्षी स्वग्रामी जाण्याकरीता रजा प्रवास सवलतीचा लाभ देण्यात येईल. ही सवलत, मंडळाच्या कर्मचा-यांच्या आई-वडील, बहिणी आणि अज्ञानी भावांसाठी अनुज्ञेय असणा-या इतर सर्व रजा प्रवास सवलीतीच्या सुविधांऐवजी असेल.

(ल) पती/पत्नी व मुले यांच्यापासून दूर राहत असल्याच्या स्थितीत जेव्हा मंडळाच्या कर्मचा-याने त्याच्या/तिच्या पत्नी/पतीस आणि अवलंबित मुलांना त्याच्या/तिच्या मुख्यालया व्यतिरिक्त अन्य ठिकाणी वास्तव्यास ठेवले असेल अशा प्रकरणात त्यास त्यांच्या करिता दोन वर्षांच्या एका गटात त्यांच्या निवासस्थानापासून ते स्वग्रामापर्यंत किंवा यथास्थिती चार वर्षांच्या एका गटात भारतातील कोणत्याही ठिकाणी जाण्यासाठी रजा प्रवास सवलतीची मुभा देण्यात येईल, परंतु कोणत्याही बाबतीत प्रतिपूर्ती ही, कुटुंबाने प्रवास केलेले प्रत्यक्ष अंतर किंवा मुंबई आणि भेट दिलेले ठिकाण/ स्वग्राम यांच्यातील अंतर यापैकी जे कमी असेल त्या अंतरापेक्षा अधिक असणार नाही.

७. स्वग्राम - "स्वग्राम" याचा अर्थ संबंधित कर्मचा-याच्या सेवा पुस्तकात किंवा इतर अधिकृत अभिलेखामध्ये नोंद केलेले कायमस्वरुपी असलेले स्वग्राम किंवा गाव आणि त्याच्याकडून योग्य कारणांनी (जसे की स्थावर मालमत्तेची मालकी, जवळच्या नातेवाईकांचे उदा. आई-वडील, भाऊ इत्यादींचे कायम स्वरुपी निवासस्थान) पुष्टी देऊन घोषित करण्यात आलेले असे ठिकाण जेथे तो सामान्यपणे राहतो परंतु मंडळाच्या सेवेत असल्यामुळे तो त्या स्थानी सध्या अनुपस्थित आहे असे इतर ठिकाण, असा आहे.

कर्मचा-याने घोषित केलेले स्वग्राम स्वीकारता येऊ शकेल किंवा कसे ठरविण्यासाठी खाली नमूद केलेले निकष लावण्यात येतील.

(एक) कर्मचा-याने घोषित केलेल्या ठिकाणी विविध स्थानिक व सामाजिक कर्तव्ये पार पाडण्यासाठी ठराविक कालांतराने तेथे त्याची प्रत्यक्ष उपस्थिति आवश्यक असते किंवा कसे आणि जर असल्यास त्याने सेवेत प्रवेश केल्यानंतर तो त्या ठिकाणास भेट देण्यासाठी वारंवार जात असतो किंवा कसे;

(दोन) त्या ठिकाणी कर्मचा-याची स्वत:ची निवासी मालमत्ता आहे किंवा कसे किंवा त्या ठिकाणच्या अशा मालमत्ता असणा-या एखाद्या संयुक्त कुटुंबाचा तो सदस्य आहे किंवा कसे;

(तीन) त्याचे जवळचे नातेवाईक त्या ठिकाणचे रहिवासी आहेत किंवा कसे;

(चार) मंडळाच्या सेवेत प्रवेश करण्यापूर्वी कर्मचारी काही वर्षे तेथे राहत होता किंवा कसे. जेव्हा त्याच्याच पूर्वी लगतचा निकष समाधानकारक ठरत नसेल तेव्हा अशाच प्रकरणात केवळ एका नंतर दुसरा निकष लागू करण्याची गरज असेल. जेव्हा कर्मचा-याकडे किंवा तो सदस्य असलेल्या कुटुंबाकडे एकापेक्षा अधिक ठिकाणी निवासी किंवा स्थावर मालमत्ता असेल तेव्हा कर्मचा-यावर अशा ठिकाणांमधून कोणतेही ठिकाण त्याबाबतीची कारणे नमूद करुन त्याचे स्वग्राम म्हणून निवड करण्याचे काम सोपवावे. परंतु कर्मचा-याचे स्वग्राम म्हणून असे ठिकाण स्वीकारायचे किंवा कसे अथवा स्वीकारायचे नाही याबाबतीत कर्मचारी जेथे सेवा नियुक्त आहे त्या विभागाच्या विभागप्रमुखाचा निर्णय अंतिम असेल. ‘स्वग्राम’ बाबतची घोषणा स्वीकारण्याकरिता जेव्हा विवक्षित ठिकाणचे जवळच्या नातेसंबंधांचे

अस्तित्व  हा निकष निश्चित केला असेल तेव्हा जवळच्या नातेसंबंधांचे अस्तित्व हे स्थायी स्वरुपाचे प्रमाणे अधिक किंवा कमी असावे.

८.१ स्वग्रामाची घोषणा:

(एक) प्रत्येक कर्मचारी आपले स्वग्राम घोषित करील. या विनियमांच्या प्रारंभापूर्वी अंमलात असलेल्या विनियमांन्वये कर्मचा-याने यापूर्वीच केलेली स्वग्रामाची घोषणा ही, त्याने या विनियमांच्या प्रयोजनार्थ केलेली असल्याप्रमाणे मानण्यात येईल. मंडळाच्या सेवेतील प्रत्येक नवीन प्रवेशार्थी मंडळाच्या सेवेत त्याचा प्रवेश झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या समाप्तीपूर्वी त्याच्या स्वग्रामाची् घोषणा करील.

(दोन) एखाद्या विभागाप्रमुखा व्यतिरिक्त अन्य कर्मचा-याने केलेली घोषणा ही, विभागप्रमुखाने त्याला आवश्यक वाटेल असा पुरावा मागविल्या नंतर त्या घोषणेच्या अचूकतेबद्दल स्वत:चे समाधान झाल्यावर ती घोषणा स्वीकारणे हे प्रत्येक प्रकरणाच्या अधीन असेल. स्वग्रामची केलेली घोषणा ही, विभाग प्रमुखाने ती स्वीकृत करण्याच्या दिनांकापासून किंवा अशी स्वीकृती कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून नव्हे तर, कर्मचा-याने अशी घोषणा करण्याच्या दिनांकापासूनच प्रभावी होईल. एखाद्या विभाग प्रमुखाने केलेली घोषणा ही अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या स्वीकृतीच्या अधीन असेल. या विनियमांच्या प्रारंभापूर्वी अंमलात असलेल्या विनियमांन्वये कर्मचा-याने केलेली व प्रकरणपरत्वे त्याच्या विभागप्रमुखाने किंवा अध्यक्षाने स्वीकृत केलेली घोषणा ही, एखाद्या विभागाच्या प्रमुखाने, अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने या विनियमांच्या प्रयोजनाकरीता स्वीकृत केलेली असल्याप्रमाणे मानण्यात येईल.

(तीन) एकदा केलेली ‘स्वग्रामा’ची घोषणा ही, सामान्यपणे अंतिम मानली जाईल, परंतु अपवादात्मक परिस्थितीत, विभागप्रमुख आणि एखादा विभागप्रमुखाच्या बाबतीत अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्याकडून अशा घोषणेतील बदल प्राधिकृत करु शकेल, परंतु, कर्मचा-याच्या सेवा कालावधीमध्ये एक पेक्षा अधिक वेळा असा बदल केला जाणार नाही. मंडळामध्ये प्रतिनियुक्तीवर आसलेल्या व्यक्तींच्या बाबतीत, फक्त प्रमुख प्राधिका-याच्या मान्यतेनंतरच अशी विनंती मान्य करण्यात येईल.

(चार) विहित कालमर्यादेनंतर केलेली स्वग्रामाची घोषणा ही, घोषणेत बदल करण्याची एक संधी , एखाद्या विभागाच्या प्रमुखाकडून (आणि एखाद्या विभागाच्या प्रमुखाच्या बाबतीत, अध्यक्ष किंवा उपाध्यक्षाकडून) स्वीकृत केली जाईल आणि ही स्वग्रामाची अंतिम घोषणा म्हणून मानली जाईल व अशा प्रकरणांत स्वग्रामात पुन्हा बदल करण्याची मुभा दिली जाणार नाही.

(पाच) एखाद्या विभागाचा प्रमुख त्याच्या स्वत:च्या सोयीसाठी त्याच्या विभागातील कर्मचा-यांच्या संबंधातील स्वग्रामाची एक नोंदवही ठेवील.

२. भारताबाहेर स्वग्रामाची घोषणा

मंडळाचा जो कर्मचारी संबंधित प्राधिका-याच्या समाधानाच्या अधीन राहून त्याचे स्वग्राम भारताबाहेर असल्याचे घोषित करील तो सुध्दा त्याच्या स्वग्रामस भेट देण्याकरिता रजा प्रवास सवलतीचा हक्कदार असेल. अशा प्रकरणातील मंडळाचे सहाय्य हे प्रवासाच्या भाडयाच्या खाली दिलेल्या हिश्श्यापुरतेच मर्यादित असेल.

(एक) स्वग्रामापर्यंत जाणा-या सर्वात जवळच्या मार्गाने रेल्वे स्थानकापासून आणि रेल्वे स्थानकापर्यंत किंवा

(दोन) भारतातील जहाजावर चढण्याच्या किंवा उतरण्याच्या बंदरापासून सर्वात जवळच्या रेल्वे स्थानकापर्यंत. या प्रयोजनाकरिता ‘सर्वात जवळचे बंदर ’ या संज्ञेचा अर्थ, मंडळ कर्मचा-याच्या स्वग्रामापासून सर्वात जवळ असणारे भारतातील बंदर, असा आहे.

३. पती आणि पत्नी दोघेही मंडळाचे कर्मचारी असल्यास :

जे पती आणि पत्नी दोघेही मंडळाचे कर्मचारी असतील त्यांना त्यांच्या मताने वेगवेगळे स्वग्राम घोषित करण्यास पसंती देता येईल आणि त्या दोघांनाही त्यांच्या आपापल्या कुटुंबांच्या सदस्यांच्या संदर्भात रजा प्रवास सवलतीच्या सर्वसाधारण तरतुदीं अन्वये सवलतीची वेगवेगळी मागणी करता येईल. तथापि, ही बाब जर पती किंवा पत्नी, आपल्या जोडीदारापैकी एकाच्या कुटुंबाचा सदस्य या नात्याने सवलत घेत असेल तर, तो किंवा ती स्वत:साठी स्वतंत्ररित्या सवलतीची मागणी करण्यास हक्कदार असणार नाही, या शर्तीच्या अधीन असेल. मुले फक्त कोणत्याही एका पालकाच्या कुटुंबाचे सदस्य या नात्याने एका विशिष्ट वर्ष गटातील लाभाकरिता पात्र असतील. अनुज्ञेयतेच्या इतर सर्व शर्ती योजनेच्या सर्वसाधारण तरतुदीं अनुसार राहतील.

९. प्रवास सुविधेचा वर्ग :

**(अ)** रेल्वेमार्गाने जोडलेल्या ठिकाणां दरम्यानचा प्रवास -

(एक) रेल्वेने प्रवास करताना, कर्मचारी खालीलप्रमाणे प्रवास सुविधा वर्गाने प्रवास करण्यास हक्कदार असेल.

(अ) पोर्ट ट्रस्ट मंडळाचे, अध्यक्ष हे राष्ट्रीय विमान वाहतुकीच्या सर्वसाधारण (वाय) वर्गाने किंवा स्वपर्यायाने वातानुकूलित प्रथम वर्गाने प्रवास करण्यास पात्र असतील. खाजगी विमान वाहतुकीने प्रवास करण्यास परवानगी असणार नाही.

(ब) वर्ग एक आणि वर्ग दोनचे अधिकारी:

| मूळ वेतन + व्यवसायरोध भत्ता | सामान्य | राजधानी एक्सप्रेस | शताब्दी एक्सप्रेस |
|---|---|---|---|
| रु.११०००व अधिक | वातानुकूलित प्रथम वर्ग | वातानुकूलित प्रथम वर्ग | वातानुकूलित खुर्चीयान |
| रु.८६०० ते रु.१०९९९ | द्वितीय वर्ग वातानुकूलित २ टियर शयनयान /प्रथम वर्ग | द्वितीय वर्ग वातानुकूलित २ टियर शयनयान | वातानुकूलित खुर्चीयान |

(क) वर्ग तीन व वर्ग चार चे कर्मचारी

| अ.क्र. | वेतन टप्पा | सामान्य गाड्या | राजधानी एक्सप्रेस | शताब्दी एक्सप्रेस |
|---|---|---|---|---|
| १. | रु.९००० व अधिक परंतु रु. १२००० पेक्षा कमी | द्वितीय वर्ग वातानुकूलित २ टियर शयनयान /प्रथम वर्ग / वातानुकूलित ३ टियर | द्वितीय वर्ग वातानुकूलित २ टियर शयनयान | वातानुकूलित खुर्चीयान |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | रु.५००० व अधिक परंतु रु.९००० पेक्षा कमी | प्रथम वर्ग / वातानुकूलित ३ टियर शयनयान/ वातानुकूलित खुर्चीयान* | वातानुकूलित खुर्चीयान | वातानुकूलित खुर्चीयान |
| ३. | रु. ५००० पेक्षा कमी | द्वितीय वर्ग शयनयान | - | - |

(ड) छोट्या कुटुंबाच्या मानकांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने, रजा प्रवास सवलतीची सुविधा ही, फक्त दोन ह्यात मुलांपर्यंतच मर्यादित राहील. आधीपासूनच दोन पेक्षा अधिक अपत्ये असणा-या आणि हा आदेश जारी होण्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत जन्मलेल्या आणि एका मुलानंतर एकाच प्रसुतीदरम्यान एकापेक्षा अधिक मुलांचा जन्म झाला असेल अशा अधिका-यांच्या मुलांच्या बाबतीत फक्त दोन हयात मुलांची मर्यादा लागू असणार नाही.

(इ) चार वर्षांच्या एका गटात रजा प्रवास सवलत घेण्याच्या कारणांच्या संख्येच्या बाबतीत, विद्यामान स्थिती ठेवली जाईल.

(फ) रजा प्रवास सवलतीचे रोखीकरण करता येणार नाही.

(ग) रजा प्रवास सवलत मिळण्याचे इतर सर्व सध्याचे नियम, विनियम व शर्ती लागू असणे सुरु राहील.

टीप: राजधानी/ शताब्दी या रेल्वेगाडयांनी केलेल्या प्रवासाबाबतची मागणी ही जेव्हा प्रत्यक्षात या रेल्वे गाडयांनी प्रवास केला गेला असेल तेव्हाच फक्त मान्य होईल. प्रवासाचा प्रारंभ व शेवट ही दोन्ही ठिकाणे राजधानी/शताब्दी रेल्वे गाडयांनी जोडलेली असावीत.

* थेट सर्वात जवळच्या मार्गावरील संबंधित स्थानके जोडणा-या कोणत्याही रेल्वेगाडयांमध्ये वरील पैकी कोणताही प्रवाससुविधा वर्ग उपलब्ध नसेल अशा बाबतीत, कर्मचा-यांना वातानुकूलित दोन टियर ने प्रवास करता येईल

(दोन) प्रवास करताना तो कर्मचारी ज्या प्रवाससुविधा वर्गाचा हक्कदार आहे त्याच रेल्वे प्रवाससुविधा वर्गाकरिता तो कर्मचारी आणि त्याचे कुटुंब हक्कदार असेल. कर्मचारी किंवा त्याचे कुटुंब किंवा दोघेही हक्कदार आहेत त्या वर्गाहून वरच्या अथवा कमी दर्जाच्या वर्गातून प्रवास करण्यास परवानगी असेल. हक्कदार असलेल्या प्रवासवर्गाचे प्रवासभाडे किंवा प्रत्यक्षात केलेला खर्च या पैकी जे कमी असेल ते देण्यातबाबत त्या मंडाळाची जबाबदारी राहील.

केवळ अध्यक्ष राष्ट्रीय हवाई वाहतुकीच्या सर्वसाधारण (वाय) वर्गाने प्रवास करु शकतील. जर कोणत्याही कर्मचा-याने/ अधिका-याने रेल्वे मार्गाने जोडलेल्या ठिकाणांच्या दरम्यान राष्ट्रीय हवाई वाहतुकीने प्रवास केला तर त्याची रजा प्रवास सवलतीची मागणी ही राजधानी/शताब्दी एक्सप्रेस वगळता तो हक्कदार असलेल्या इतर रेल्वे प्रवासाच्या वर्गाच्या भाडया इतकीच मर्यादित राहील.

(तीन) (अ) कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांना रेल्वे प्राधिकरणांनी देऊ केलेले परतीच्या प्रवासाचे सवलत तिकीट (उदा. हंगामी सवलत, विद्यार्थी सवलत, इ.) घेता येईल. ते हक्कदार असलेल्या प्रवास वर्गाहून अन्य कोणत्याही वरच्या किंवा कमी दर्जाच्या वर्गातून प्रवास करताना अशा सवलतीच्या तिकीटाचा वापर रजाप्रवास सवलतीसह करण्यास परवानगी देण्यात येईल.

(ब) जेव्हा एखादा कर्मचारी आणि/किंवा त्याचे कुटुंब हे, रजा प्रवास सवलतीसह रेल्वे प्राधिकरणांनी दिलेले सवलतीचे प्रवास तिकीट घेईल. तेव्हा, सर्वात

जवळच्या मार्गाने मुंबई आणि स्वग्राम यांच्या दरम्यानच्या प्रवासासाठी हक्कदार असलेल्या प्रत्यक्षात केलेल्या खर्चासाठी सामान्य दराच्या प्रवास भाडयाची प्रतिपूर्ती कर्मचा-यास करण्यात येईल. चार वर्षांच्या एका गटात, भारतातील कोणत्याही स्थळास भेट देण्याकरिता सवलतीच्या वर्तुळाकार तिकीटाआधारे प्रवास करण्यात आला असेल त्याप्रकरणात खर्चाची प्रतिपूर्ती ही हक्कदार प्रवास वर्गाच्या सामान्य दराच्या प्रवास भाड्याप्रमाणे किंवा सर्वात जवळच्या मार्गाने मुंबई आणि भेट दिलेल्या स्थाळापर्यंत प्रत्यक्षात केलेल्या प्रवास खर्चाप्रमाणे केली जाईल.

(चार) सर्वसामान्यपणे प्रथम वर्गाने प्रवास करण्यास हक्कदार असलेला कर्मचारी स्वत:साठी जर सवलतीचा लाभ घेत असेल तर त्याला डिलक्स वातानुकूलित रेल्वे गाड्यांमधून दुस-या वर्गाने प्रवास करता येईल.

(पाच) जेव्हा एखादया कर्मचा-याने किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने रेल्वे प्रवाससुविधेच्या दोन वेगवेगळ्या वर्गांमधून दूरच्या मार्गाने (स्वस्त नसलेल्या) उदा. काही भागाचा प्रवास तो हक्कदार असलेल्या प्रथम वर्गाने आणि काही भागाचा प्रवास द्वितीय वर्गाने केला असेल तेव्हा खर्चाची प्रतिपूर्ती ही संपूर्ण अंतराकरीता हक्कदार असलेल्या वर्गाचे प्रवास भाडे/प्रत्यक्षात केलेला खर्च यांपैकी जे कमी असेल त्याप्रमाणे केली जाईल.

(सहा) जेथे एखाद्या कर्मचा-याने किंवा त्याच्या कुटुंबाने किंवा दोघांनी रेल्वे मार्गाने जोडलेल्या दोन स्थळांच्या दरम्यान हवाई मार्गाने किंवा रस्त्याने किंवा बोटीने प्रवास केला असेल तर मंडळाकडून मिळणारे सहाय्य हे, कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबाने अधिकृत वर्गातून रेल्वेमार्गाने प्रवास केल्यावर त्याला जो खर्च अनुज्ञेय झाला असता तितका खर्च किंवा प्रत्यक्षात केलेला खर्च यापैकी जो कमी असेल त्या खर्चा इतका मर्यादित असेल.

**(ब)** रेल्वेमार्गाने न जोडलेल्या स्थळांदरम्यानचा प्रवास:

(एक) रस्त्याने:

जेथे निश्चित केलेल्या ठिकाणांच्या दरम्यान, ठराविक कालांतराने आणि विद्यमान निश्चित दराने प्रवासभाडे आकारुन सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमार्फत वाहने चालवली जातात तेथे, अशा यंत्रणेमार्फत वाहतूक व्यवस्थेच्या प्रवास सुविधेच्या उचित वर्गाकरिता प्रत्यक्षात जे प्रवासभाडे आकारले जाईल त्यानुसार सहाय्य देण्यात येईल.

उचित प्रवास सुविधा वर्ग म्हणजे:

(अ) वर्ग - एक आणि दोन चे अधिकारी : कोणत्याही प्रकारची बसगाडी

(ब) रेल्वेमार्गाने प्रथम वर्ग व त्यावरील वर्गाने प्रवास करण्यास हक्कदार आहेत असे वर्ग-तीन आणि चार चे कर्मचारी : कोणत्याही प्रकारची बसगाडी

(क) इतर वर्ग तीन आणि चार चे कर्मचारी : सर्वसाधारण किंवा जलद बसगाडी.

(दोन) हवाई मार्गाने:

रेल्वेमार्गाने न जोडलेल्या स्थळांपर्यंत जेथे प्रवासाची पर्यायी साधने एकतर उपलब्ध नाहीत किंवा अधिक खर्चिक आहेत अशा ठिकाणी मंडळाचे कर्मचारी हवाई मार्गाने प्रवास करु शकतील.

**(क)** पोर्ट ब्लेअर पर्यंतचा प्रवास

जहाजात चढण्यासाठी करावयाचा बंदरापर्यंतचा प्रवास नेहमीप्रमाणे विनियमित केला जाईल. जहाजात चढण्याच्या बंदरापासून पोर्ट ब्लेअर पर्यंतच्या प्रवासाचे हक्क खालीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र | मूळ वेतन | हक्कदार वर्ग | | |
|---|---|---|---|---|
| | | एम.व्ही अकबर | एम.व्ही.माजिद | इतर |
| (अ) | सर्व वर्ग एक व दोन चे अधिकारी | प्रसाधनगृह संलग्न कक्षासह उच्चश्रेणी वर्ग | प्रथम वर्ग | उच्चश्रेणी कक्ष |
| (ब) | रु.७८६० व त्यापेक्षा अधिक मूळ वेतन घेणारे वर्ग तीनचे कर्मचारी | प्रसाधनगृह संलग्न कक्षासह उच्चश्रेणी वर्ग | प्रथम वर्ग | प्रथम वर्ग कक्ष |
| (क) | रु.५७८० व त्यापेक्षा अधिक परंतु रु. ७८६० पेक्षा कमी मूळ वेतन घेणारे वर्ग तीनचे कर्मचारी | सामायिक प्रसाधनगृहासह प्रथम श्रेणी वर्ग | प्रथम वर्ग | प्रथम वर्ग कक्ष |
| (ड) | रु.५१४० व त्यापेक्षा अधिक परंतु रु.५७८० पेक्षा कमी मूळवेतन घेणारे वर्ग तीनचे कर्मचारी | वातानुकूलित शयनशाला वर्ग | द्वितीय वर्ग | द्वितीय वर्ग ‘अ’ कक्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (इ) | रु.५१४० पेक्षा कमी मूळवेतन घेणारे वर्ग तीनचे कर्मचारी | वातानुकूलित शयनशाला वर्ग | सोफा | द्वितीय श्रेणी कक्ष |
| (फ) | सर्व वर्ग चार चे कर्मचारी | शयनवर्ग | बैठक व्यवस्था | शयनवर्ग |

**(ड)** सागरीमार्गाने किंवा बोटीने प्रवास करण्यासाठी

| अ.क्र | मूळ वेतन | हक्कदार वर्ग |
|---|---|---|
| (अ) | सर्व वर्ग एक व दोन चे अधिकारी | उच्चतम वर्ग |
| (ब) | रु.७८६० आणि त्यापेक्षा अधिक मूळ वेतन घेणारे वर्ग तीनचे कर्मचारी | उच्चतम वर्ग |
| (क) | रु.५७८० व त्यापेक्षा अधिक परंतु रु. ७८६० पेक्षा कमी मूळ वेतन घेणारे वर्ग तीनचे कर्मचारी | जर दोन प्रकारचे वर्ग उपलब्ध असतील तर निम्न वर्ग. जर दोन पेक्षा अधिक प्रकारचे वर्ग उपलब्ध असतील तर मध्यम किंवा द्वितीय वर्ग. |
| (ड) | रु.५१४० व त्यापेक्षा अधिक परंतु रु.५७८० पेक्षा कमी मूळ वेतन घेणारे वर्ग तीनचे कर्मचारी | जर दोन प्रकारचे वर्ग उपलब्ध असतील तर फक्त निम्न वर्ग. जर दोनपेक्षा अधिक प्रकारचे वर्ग उपलब्ध असतील तर मध्यम किंवा द्वितीय वर्ग. |
| (इ) | रु.५१४० पेक्षा कमी मूळ वेतन घेणारे वर्ग तीनचे कर्मचारी | जर चार प्रकारचे वर्ग उपलब्ध असतील तर तृतीय वर्ग |
| (फ) | सर्व वर्ग चार चे कर्मचारी | सर्वात निम्न वर्ग |

**(इ)** खालील प्रकारच्या वाहनांनी केलेला प्रवास हा रजा प्रवास सवलतीच्या प्रयोजनार्थ मान्य केला जाणार नाही:

(अ) खाजगी व्यक्तींनी सार्वजनिक क्षेत्रामधील पर्यटन विकास विभाग किंवा राज्य परिवहन महामंडळ किंवा स्थानिक संस्थांचे परिवहन उपक्रम यांच्याकडून भाड्याने घेतलेली व अशा खाजगी व्यक्तींकडून किरायावर चालविण्यात येणा-या वाहनांसह भाड्याने घेतलेली खाजगी वाहने.

(ब) मुंबई पोर्ट ट्रस्ट मंडळाच्या कर्मचा-यांची स्वत:ची, त्यांनी उसनवारीने घेतलेली किंवा भाड्याने घेतलेली वाहने - तथापि विभागीय परिवहन प्राधिकरण/राज्य शासन यांच्या मान्यतेने, निश्चित प्रवासभाडे दराने, ठराविक कालांतराने एका ठिकाणापासून दुस-या ठिकाणापर्यंत अशी नियमित परिवहन सेवा देणा-या खाजगी बसगाडयांनी केलेला प्रवास हा खाजगी किरायाने घेतलेल्या बसगाडीने केलेला प्रवास असल्याचे मानले जाणार नाही. जेव्हा भारतीय पर्यटन विकास महामंडळ/ राज्य पर्यटन विकास महामंडळ यांनी प्रवासाचे पूर्णपणे आयोजन केले असेल व व्यवस्था केली असेल त्या प्रकरणात संपूर्णत: प्रवासाचे कार्यचालन करण्यात आले असेल व हा प्रवास प्रत्यक्षात पूर्णपणे त्यांच्याकडून आयोजित /त्याची व्यवस्था करण्यात आली होती व इतर कोणत्याही खाजगी व्यक्ती/समूहाकडून आयोजित करण्यात आला नव्हता असे प्रमाणित केले असेल तरच फक्त असा किरायाने घेतलेल्या बसने केलेला प्रवास हा रजा प्रवास सवलतीकरिता अनुज्ञेय असेल.

(क) किरायाने घेतलेल्या वाहनातून केलेला प्रवास हा, राज्य अथवा केंद्रीय उपक्रमाने पूर्णपणे आयोजित केलेला व व्यवस्था केलेला असल्याखेरीज, किरायाने घेतलेल्या रेल्वेगाडीच्या डब्यातून केलेला प्रवास सुध्दा रजाप्रवास सवलतीकरिता अनुज्ञेय असणार नाही.

**(फ)** भूपृष्ठावरील परिवहन व्यवस्थेत निर्माण झालेली तात्पुरती अनुपलब्धता ही पर्यायी साधनांची अनुपलब्धता असल्याचे मानण्यात येणार नाही. अशा प्रकरणातील प्रतिपूर्ती ही रस्ताच्या /रेल्वेमार्गाच्या प्रवासाकरिता हक्कदार असलेल्या वर्गापुरतीच मर्यादित राहील.

**(ग)** जेव्हा पती व पत्नी दोघेही मंडळाचे कर्मचारी असतील तेव्हा, अशा कुटुबांस अनुज्ञेय असणारी सवलत ही, पती किंवा पत्नी या दोघांपैकी फक्त एकास अनुज्ञेय असल्याप्रमाणे असेल.

**(ह)** (अ) आरक्षित प्रवास सुविधा वर्गात अतिजलद एक्सप्रेस गाड्यांनी प्रवास करणा-या ज्या कर्मचा-यांकडून रेल्वेने विशेष पूरक खर्च वसूल केला असेल तर तो खर्च सुध्दा रेल्वे प्रवासभाड्याच्या रकमेप्रमाणेच रजा प्रवास सवलती अंतर्गत प्रतिपूर्ती योग्य असेल.

(ब) आरक्षण खर्चाकरिता आलेला अतिरिक्त खर्च हा मंडळाकडून सोसण्यात येईल.

(क) ज्या प्रकरणात, रजा प्रवास सवलती वरील प्रवासाच्या संबंधात रेल्वेगाडीतील शायिका आरक्षित करण्याकरिता रेल्वे प्राधिकरणास प्रदान केलेल्या तार शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय नसेल.

(ड) सवलत घेऊन केलेल्या प्रवासासाठी कोणताही आनुषंगिक खर्च अनुज्ञेय नसेल.

**(आय)** सर्वात जवळच्या मार्गावर आधारित सवलत:

(अ) प्रकरणपरत्वे, मुंबई आणि कर्मचा-याने भेट दिलेले ठिकाण किंवा त्याचे स्वग्राम या दरम्यानच्या रेल्वे प्रवास भाडयाच्या खर्चा बाबतची मंडळाची जबाबदारी ही "थेट" तिकीटाच्या आधारावर मोजलेल्या सर्वात जवळच्या मार्गावरील प्रवास भाड्यापुरतीच मर्यादित असेल. प्रकरणपरत्वे, कर्मचा-याने भेट दिलेल्या ठिकाणापासून किंवा ठिकाणापर्यंत किंवा स्वग्रामापासून स्वग्रामापर्यंत कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्य हे कोणत्याही मार्गाने प्रवास करु शकतील किंवा कोठेही मुक्काम करु शकतील, परंतु मंडळाचे सहाय्य वरीलप्रमाणे फक्त प्रवासभाडयातील त्यांच्या हिश्शापुरताच मर्यादित राहील. जेव्हा सर्वात जवळचा मार्ग हा अपघात किंवा इतर कारणांमुळे विस्कळित झालेला असेल तेव्हा विभागप्रमुख हे प्रत्यक्षात प्रवास केलेल्या मार्गानुसार प्रतिपूर्ती करण्याच्या अधिकाराचा वापर करतील.

(ब) जेथे वाहतुकीची एका पेक्षा अधिक प्रकारची साधने उपलब्ध असतील अशा प्रकरणात, उदा. जेथे दोन स्थळे ही थेट बसमार्गानेच बरोबर दूरच्या मार्गाने वाहतूक करणा-या बस मार्गाने जोडलेली असतील आणि जेथे इतर सार्वजनिक वाहतुकीचीसाधने सुध्दा उपलब्ध असतील आणि सर्वात जवळचा व्यवहार्य मार्ग ठरविण्यात अडचण किंवा शंका उद्भवत असेल तेथे संबंधित स्थानिक प्राधिकरणांनी निश्चित केलेल अंतर हे स्थानिक प्रवासाच्या प्रयोजनासाठी स्वीकृत केले जाईल.

स्पष्टीकरण:

‘सर्वात जवळचा मार्ग’ या संज्ञेची अर्थ उकल ही, कर्तव्यार्थ प्रवासाकरिता मान्य केल्यासारखी असेल.

**(ज)** स्वग्रामास भेट देण्याकरिता जास्तीच्या मैल अंतराचा प्रवास जर संपूर्ण रजा प्रवासात किंवा त्याच्या काही भागात कर्मचा-यास रेल्वेला गृहीत किंवा जास्तीच्या मैल अंतराच्या आधारे (उदा. काल्का-सिमला क्षेत्रावर) किंवा चलनवाढीव दराने (उदा.सिलीगुडी-दार्जिलिंग क्षेत्रावर) प्रवास भाडे द्यावे लागले असेल आणि जर रेल्वेमार्गाने प्रवास केलेल्या एकूण अंतराचे प्रवासभाडे (प्रकरणापरत्वे गृहीत किंवा जास्तीच्या मैल अंतराच्या आधारे किंवा चलनवाढीव दराने आकारालेल्या प्रवास भाड्यासह ) हे, प्राथमिक अंतराकरिता सामान्य दराने आकारलेल्या प्रवासभाडयापेक्षा अधिक असेल तर, संबंधित कर्मचारी, मुंबई आणि त्याने प्रत्यक्षात भेट दिलेल्या स्थळादरम्यानचे किंवा प्रकरणपरत्वे त्याच्या स्वग्रामादरम्यानचे प्रत्यक्ष अंतर विचारात न घेता, प्रवास सवलतीस हक्कदार असेल. अशा प्रकरणात मंडळाकडून कर्मचा-यास दिली जाणारी प्रतिपूर्ती योग्य रक्कम ही, मुंबईपासून भेट दिलेल्या स्थळापर्यंत किंवा स्वग्रामापर्यंतच्या प्रत्यक्ष रेल्वे प्रवासभाड्याचे मूल्य (सर्व प्रवासी करांसहित) आणि मुंबई पासून प्रवासास जाण्याच्या व परतीच्या रेल्वे प्रवासभाड्याच्या (सर्व प्रवासी करांसहित) सर्व साधारण दराने असणारे मूल्य यांच्यातील फरकाइतकी असेल.

टीप

जेव्हा केव्हा वेतनश्रेणी सुधारित केल्या जातील तेव्हा सुधारित वेतनश्रेणीच्या संबंधीच्या तत्सम वेतन मर्यादांनुरुप, या विनियमात विहित केलेल्या वेतन मर्यादा सुधारित केल्या जातील.

१०. रजा प्रवास सवलत फक्त भारताअंतर्गत मर्यादित असणे:

(अ) भारतातील कोणतेही स्थळ यामध्ये भारताच्या राज्यक्षेत्रातील कोणत्याही स्थळाचा समावेश असेल मग ते भारताच्या मुख्य भूमीवरील किंवा समुद्रपार असो, रेल्वेमार्गाने जोडलेले असो, किंवा रेल्वे मार्गाने अंशत: जोडलेले असो आणि अंशत: रस्त्याने किंवा अंशत: आगबोट सेवेने जोडलेले असो आणि रेल्वेमार्गाने जोडलेले नसो. भारतातील कोणतेही स्थळ यात मंडळाच्या कर्मचा-याच्या स्वग्रामाचा सुध्दा समावेश असेल.

(ब) मंडळाच्या कर्मचा-याने आणि/किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्याने (सदस्यांनी) भारतातील कोणत्याही स्थळात भेट देण्यासाठी रजा प्रवास सवलतीचा लाभ घ्यावयाचे प्रस्तावित केले असेल तेव्हा मंडळाच्या कर्मचा-याने भेट देण्याचे उद्देशित स्थळ त्याच्या विभागप्रमुखांकडे आगावू रीतीने घोषित केले पाहीजे.

(क) मंडळाचा कर्मचारी आणि/किंवा प्रकरणपरत्वे त्याच्या कुटुंबातील सदस्य (अनेक सदस्य) यांनी रजा प्रवासा सवलतीची मागणी करण्यास पात्र होण्याकरिता घोषित केलेल्या स्थळालाच भेट द्यायला हवी. घोषित केलेल्या भेटीच्या स्थळापर्यंचा प्रवास हा कोणत्याही मार्गाने करता येईल परंतु मुख्यालय आणि घोषित केलेले भेट द्यावयाचे स्थळ या दरम्यानच्या थेट तिकीटाच्या आधारावर, सर्वात जवळच्या थेट मार्गाच्या संदर्भाने सवलतीच्या मागणीचे विनियमन करण्यात येईल.

(ड) प्रवास सुरु करण्यापूर्वी, विभागप्रमुखांच्या किंवा विभागप्रमुखाच्या बाबतीत प्रकरणपरत्वे अध्यक्ष/उपाध्यक्ष्यांच्या मान्यतेने, घोषित केलेल्या भेट

देण्याच्या स्थळात बदल करता येऊ शकेल. प्रवास सुरु झाल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही.

अपवाद:

(अ) तथापि, जर मंडळाच्या कर्मचा-याच्या आवाक्याच्या बाहेरील परिस्थितीमुळे प्रवास सुरु करण्यापूर्वी बदलाची विनंती करता येऊ शकली नाही असे सिध्द झाले असल्यास ही शर्त प्रकरणपरत्वे विभागप्रमुख/अध्यक्ष/उपाध्यक्ष यांच्याद्वारे शिथिल केली जाईल आणि मागणी मान्य केली जाईल.

(ब) जर मंडळाचा कर्मचारी घोषित केलेल्या इष्ट स्थानाचा ४ वर्षांच्या रजा प्रवास सवलती अंतर्गत प्रवास करीत असताना त्याला प्रवासादरम्यान त्या मार्गावरील एखाद्या विशिष्ट स्थानकावर थांबावे लागले होते आणि म्हणून त्याच्या आवाक्याबाहेरील परिस्थितीमुळे तो घोषित केलेल्या स्थळास भेट देऊ शकला नसेल तर, त्याची सवलतीची मागणी मान्य केली जाईल. परंतु, असे मधले स्थानक हे, त्याने घोषित केलेल्या इष्ट स्थानाच्या मार्गावरील स्थानक असले पाहिजे.

११. रजेचे स्वरुप:

(एक) रजा प्रवास सवलत ही, नियमित/नैमित्तिक/विशेष नैमित्तिक रजा, प्रसुति रजा या दरम्यान कर्मचा-याने केलेल्या प्रवासासाठी रजेचा कालावधी विचारात न घेता अनुज्ञेय राहील. जर कर्मचारी प्रकरणपरत्वे नियमित रजा किंवा नैमित्तिक रजा, विशेष/प्रसुति रजेवर गेलेला असेल आणि त्यानंतर कामावर परत येण्याशिवाय त्याने त्याच्या पदाचा राजीनामा दिला असेल तर, त्यास रजा प्रवास सवलत अनुज्ञेय असणार नाही. उपरिनिर्दिष्ट शर्ती या कर्मचा-याच्या कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या प्रवासास लागू नसतील.

(दोन) अंतर्गत कर्मचारीवर्गाच्या बाबतीत रविवार, वैकल्पिक सुट्या किंवा दुसरा व चौथा शनिवार यांसह केवळ सुट्यांच्या इतर कोणत्याही कालावधीदरम्यान रजा प्रवास सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

(तीन) कर्मचारी आणि त्याच्या कुटुंबियांना, सेवानिवृत्तीपूर्वीची रजा, नाकारलेली रजा किंवा अंतिम रजा या दरम्यान मुंबईपासून फक्त बाहेरच्या प्रवासाच्यासंबंधात रजा प्रवास सवलत अनुज्ञेय असेल, परंतु, त्यांनी वित्तीय वर्षांच्या त्या विवक्षित गटात त्यापूर्वी रजा प्रवास सवलत घेतलेली नसावी. अशा प्रकरणांमध्ये कर्मचारी व त्याच्या कुटुंबातील सदस्य या दोहोंच्याही प्रवासाची सुरुवात ही रजा कालावधीमध्ये झाली पाहिजे.

(चार) कर्मचारी किंवा त्याचे सदस्य किंवा दोघेही, त्याच्या स्वग्रामी राहण्याचा प्रत्यक्ष कालावधी विचारात न घेता रजा प्रवास सवलतीकरिता हक्कदार असतील.

**१२.** (१) सवलतीबाबतची मागणी दाखल करुन घेण्याची पद्धत - चार वर्षांच्या एका गटात स्वग्रामापर्यंत केलेल्या प्रवासाच्या बाबतीतील आणि भारतातील कोणत्याही स्थळापर्यंत केलेल्या प्रवासाच्या बाबतीतील रोख रकमेची प्रतिपूर्ती ही, असा प्रवास प्रत्यक्षात केला होता आणि ज्या करिता प्रतिपुर्तीची मागणी केली आहे त्याहून निम्न अशा प्रवास सुविधा वर्गातून प्रवास केलेला नाही अशा आशयाच्या सर्वसाधारण प्रमाणपत्रांसह प्रवास भत्ता देयक प्रपत्रांमध्ये मागणी सादर करुन करण्यात येईल.

(२) विहित प्रमाणपत्रे संबंधित विभागप्रमुखांकडून एक आणि कर्मचा-याकडून दुसरे अशी दोन प्रमाणपत्रे परिशिष्ट एक व दोन प्रमाणे, शक्य तितक्या लवकर, रजा प्रवास सवलतीसाठीच्या प्रवास भत्ता देयकासह लेखाधिका-याकडे सादर करण्यात येतील.

(३) आवश्यक पुरावे - या विनियमा अन्वये या प्रवासाकरिता सहाय्याची मागणी केली आहे तो प्रवास सुरु करण्यापूर्वी, कर्मचा-याने त्याच्या विभागप्रमुखास किंवा याबाबतीत

विभागप्रमुखाने नियुक्त केलेल्या अधिका-यास सूचित केले पाहिजे. त्याने, तो प्रत्यक्षात प्रवास करणार असल्याबद्दलचे लेखाधिकारी वेळोवेळी विहित करील अशा प्रकारचे पुरावे उदा. रेल्वे तिकीटांचे अनुक्रमांक, रोख रकमेच्या पावत्या इ. सुध्दा सादर केले पाहिजेत. या विनियमां अन्वये, कर्मचारी किंवा त्याचे कुटुंबिय किंवा दोघेही यांनी प्रवासास सुरुवात करण्यापूर्वी, विभागप्रमुखास पूर्व सूचना दिल्यास, रेल्वे तिकिटांचे अनुक्रमांक किंवा रोख रकमेच्या पावत्या सादर करण्याची बाब विभागप्रमुखाकडून आणि विभागप्रमुखाच्या बाबतीत उपाध्यक्ष किंवा अध्यक्ष यांच्या कडून अल्प प्रमाणात शिथिल केली जाईल. परंतु सवलतीच्या मागणीची सत्यता आणि प्रवास करण्यात येणार असल्याचा खरेपणा याबाबत त्यांचे अन्यथा समाधान झालेले असावे.

**१३.** दिलेल्या सहाय्याचे अभिलेख - या विनियमा अन्वये दिलेल्या सर्व सहाय्याचे अभिलेख योग्यरीतीने ठेवले जातील. हा अभिलेख सेवापत्रकामध्ये किंवा इतर समुचित अभिलेखात नोंदींच्या स्वरुपात ठेवले जातील आणि त्यातून प्रवासास किंवा प्रवासांना सुरुवात केल्याची तारीख किंवा तारखा दर्शविलेल्या असतील. सेवा पत्रक सुस्थितीत ठेवण्यास जबाबदार असलेले प्राधिकारी, कर्मचारी केव्हा पासून रजेवर आहे अणि त्याने केव्हा पासून रजाप्रवास सवलतीचा लाभ घेतला आहे अणि अभिलेखात दर्शविल्यानुसार त्याने प्रत्यक्षात प्रवास केला आहे याबाबत खात्री करतील.

**१४.** अग्रिम - कर्मचा-यास रजा प्रवास सवलतीचा लाभ घेणे सोयीचे व्हावे या करिता खालील अटी व शर्तींवर अग्रिम मंजूर केले जाईल:

(अ) प्रत्येक प्रकरणात अग्रिमाची रक्कम ही, मंडळाकडून दोन्ही मार्गाच्या (जाण्याच्या व येण्याच्या) प्रवास खर्चाच्या संबंधात जेवढ्या अंदाजित रकमेची प्रतिपूर्ती करावयाची असेल त्या रकमेच्या ९० टक्क्यांइतकी मर्यादित असेल;

(ब) जेव्हा कर्मचारी आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी त्यांच्याकरिता स्वतंत्रपणे, म्हणजेच वेगवेगळ्या वेळी रजा प्रवास सवलतीचा लाभ घेतला

असेल तेव्हा अग्रिम हे अनुज्ञेय मर्यादेनुसार स्वतंत्रपणे काढण्यात यावे आणि मागणीचे समायोजन वेगवेगळे करण्यात यावे. तथापि, जेथे कर्मचा-याने त्याच्या कुटुंबाच्या सदस्यांच्या बाबतीत एकत्रित अग्रिम काढले असेल तेथे मागणीचे समायोजन हे एकाच देयकात काढण्यात येईल;

(क) जाण्याचा प्रवास सुरु करतेवेळी, कर्मचारी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्य किंवा दोघांच्यासाठी जाण्याच्या व परतीच्या दोन्ही प्रवासाकरिता अग्रिम काढण्यात यावे, परंतु कर्मचा-याने घेतलेल्या रजेचा कालावधी किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या अपेक्षित अनुपस्थितीचा कालावधी हा **९०** दिवसांपेक्षा जास्त असणार नाही. जेथे रजेचा कालावधी किंवा अपेक्षित अनुपस्थितीचा कालावधी हा उक्त मर्यादेपेक्षा जास्त असेल तेथे, अग्रिम हे फक्त जाण्याच्या प्रवासाकरिता काढले जाईल. ज्या बाबतीत जाण्याच्या आणि परतीच्या अशा दोन्ही प्रवासांकरिता अग्रिम काढण्यात आले असेल आणि त्यानंतर एकतर कर्मचारी किंवा कर्मचा-याचे कुटुंबिय यांच्या मुंबई पासूनचा अनुपस्थितीचा कालावधी उक्त मर्यादेपेक्षा वाढण्याची शक्यता आहे असे स्पष्ट झाले असेल त्याबाबतीत अग्रिमाची अर्धी रक्कम (ठोक रकमेने) तात्काळ मंडळास परत केली पाहिजे;

(ड) अस्थायी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या बाबतीत, अग्रिम हे त्यांनी एखाद्या स्थायी कर्मचा-याकडून हमी सादर करण्याच्या अधीन राहून, मंजूर केले जाईल. ज्या कर्मचा-यांची **५** वर्षां पेक्षा अधिक अखंडित सेवा झाली आहे त्यांना ही बाब लागू नसेल;

(इ) अग्रिम मंजूर झाल्यापासून **६०** दिवसांच्या आत जाण्याचा प्रवास सुरु केला नसेल तर, संपूर्ण अग्रिम हे तात्काळ परत करावे लागेल. सर्व प्रकरणांमध्ये,

अग्रिम काढल्यापासून दहा दिवसांच्या आत कर्मचा-याने रेल्वे किंवा बस तिकीटे इ. सादर केली पाहिजेत.

(फ) काढलेल्या अग्रिमाच्या समायोजनातून प्रवासभत्त्याची मागणी ही परतीचा प्रवास संपल्यानंतर एक महिन्याच्या आत तयार केली पाहिजे; आणि जर अग्रिम काढले नसेल तर, तीन महिन्यांच्या आत अशी मागणी सादर केली पाहिजे;

(ग) रजा प्रवास सवलतीसाठी काढलेल्या अग्रिमाचा हिशेब हा, ज्या प्रकारे दौ-यावरील प्रवास भत्याचा हिशेब दिला जातो त्याच प्रकारे प्रवास समाप्त केल्यानंतर देण्यात येईल;

(ह) लेखाअधिका-यांनी सुस्थितीत ठेवलेल्या यथोचित नोंदवहीच्या माध्यमातून अग्रिमाच्या समायोजनावर लक्ष ठेवले जाईल.

(आय) मंडळाच्या कर्मचा-याने अग्रिम काढलेले असेल तेव्हा परतीचा प्रवास पूर्ण झाल्यानंतर एक महिन्याच्या आत प्रवासावर झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी सादर करण्यत येईल. मंडळाचा कर्मचारी असे करण्यास अयशस्वी ठरला तर, त्याला अग्रिमाची संपूर्ण रक्कम तात्काळ एका ठोक रकमेत परत करावी लागेल. अग्रिमाची वसुली हफ्त्यांमध्ये करण्याची विनंती विचारात घेतली जाणार नाही.

(ज) जर अग्रिम मंजूर करण्यासाठी घालून दिलेल्या शर्तीचे पालन झालेले नसेल किंवा जर रजा प्रवास सवलतीकरिता अग्रिम मंजूर करण्याच्या नियमांचे उल्लंघन झालेले असेल तर विभागप्रमुखांनी वाहन खरेदी (मोटार कार

व्यतिरिक्त) करिता असलेल्या व्याजदराहून २ १/२ टक्के इतक्या अधिक दराने दंडनीय व्याज आकारावे;

(के) प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचा-याच्या बाबतीत त्याने प्रतिनियुक्ती स्वीकारल्यावर लगेच परंतु त्याच्या मूळ कार्यालयात रुजू होण्यापूर्वी रजा प्रवास सवलत मागितली असेल तर, प्रतिनियुक्तीवर घेणारा विभाग, प्रतिनियुक्तीवर पाठवणा-या विभागाशी विचारविनिमय करुन, त्यास अग्रिम मंजूर करु शकेल व त्याची एक प्रत, अग्रिमाच्या समायोजनावर लक्ष ठेवणे शक्य व्हावे, याकरीता प्रतिनियुक्तीवर पाठवणा-या विभागास पृष्ठांकित करेल.

**१५**. लेखाशीर्ष - रजा प्रवास सवलतीवरील खर्च हा **५३०** "रजा प्रवास सवलत" या प्रकाराखाली संबंधित खर्च केंद्राच्या खाती खर्ची घालण्यात येईल.

**१६**. अर्थ लावणे - हे विनियम कोणत्या कर्मचा-यास लागू आहेत या संबंधात शंका उदभवलेल्या सर्व प्रकरणांमध्ये किंवा अर्थ लावण्याच्या बाबतीत अध्यक्षांचा निर्णय हा अंतिम असेल.

परंतु, अध्यक्षांच्या कोणत्याही निर्णयामुळे व्यथित झालेला एखादा कर्मचारी हा आदेश प्राप्त झाल्याच्या **६०** दिवसांच्या आत मंडळाकडे अपील करु शकेल व मंडळ त्यावर उचित वाटेल असा निर्णय घेऊ शकेल.

१७. विनियम १७.

१) जेव्हा अंशतः निम्न वर्गाने आणि अंशतः हक्कदार असलेल्या प्रवासवर्गाने रेल्वेने एखाद्या दूरच्या मार्गाने प्रवास केलेला असेल तेव्हा, मागणीचे विनियमन हे, प्रत्यक्षात वापरलेल्या दूरच्या मार्गाने अशा पध्दतीने कापलेल्या अंतराच्या प्रमाणात सर्वात जवळच्या मार्गाने वेगवेगळ्या प्रवास पध्दतीच्या/ प्रवासवर्गाच्या मैल भत्त्याची परिगणना करुन त्याच्या प्रमाणशीर आधारावर करावयाचे आहे.

२) एखाद्या कर्मचा-याने नुकत्याच उपभोगलेल्या प्रवास वर्गाच्या संबंधातील विशेषाधिकार प्रतिकूलतेने बाधित होणार नाही, म्हणजेच, असे म्हणता येईल की एखादा कर्मचारी जो की अगोदरच प्रवास सुविधेच्या वरचा वर्गाचा उपभोग घेत असेल तर अशा उपभोगाच्या बाबतीत पूर्वीचे विनियम त्याचप्रकारे लागू असणे सुरु राहील.

१८. निरसन व व्यवृत्ती - या विनियमांशी अनुरुप असणारे सर्व विनियम आणि या विनियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असणारे सर्व विनियम याद्वारे निरसित होतील:

परंतु, अशा निरसित केलेल्या विनियमां अन्वये दिलेला कोणताही आदेश किंवा केलेली कोणतीही कारवाई ही, या विनियमांतील अनुरुप तरतुदींअन्वये दिलेला आदेश किंवा केलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

-----------

c6/marathi regulation/leave travel concession